# वसई विरार शहर महानगरपालिका

## सुधारित अर्थसंकल्प सन २०१६-१७ सह सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत मा. आयुक्त यांची टिपणी

मा. स्थायी समिती सभापती व सन्माननिय सदस्य,

मी वसई विरार शहर महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९५ अन्वये सन २०१६-१७ या वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे सुधारित अर्थसंकल्प व सन २०१७-१८ या वर्षाचे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करीत आहे. याच अधिनियमाचे कलम ९६ नुसार सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत सविस्तर विचार विमर्ष करुन अर्थसंकल्प मा. महासभेपुढे सादर करणेस मा. स्थायी समितीच्या शिफारशीसाठी सविनय सादर.

**अर्थसंकल्पीय गोषवारा**

| वर्ष | प्रारंभिक शिल्लक | जमा रकमा | प्रारंभिक शिलकेसह एकूण | खर्च रकमा | अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| सन २०१३-१४ | रु.६६४ कोटी ४३ लक्ष | रु. ७१३ कोटी १९ लक्ष | रु. १३७७ कोटी ६३ लक्ष | रु. ८२७ कोटी ७२ लक्ष | रु. ५४९ कोटी ९० लक्ष |
| सन २०१४-१५ | रु. ५४९ कोटी ९० लक्ष | रु. ७६६ कोटी ७७ लक्ष | रु. १३१६ कोटी ६७ लक्ष | रु.९८८ कोटी ८४ लक्ष | रु. ३२७ कोटी ८३ लक्ष |
| सन २०१५-१६ | रु. ३२७ कोटी ८३ लक्ष | रु. ८६२ कोटी ७३ लक्ष | रु. ११९० कोटी ५६ लक्ष | रु. ८२३ कोटी १९ लक्ष | रु. ३६७ कोटी २० लक्ष |
| सुधारीत अंदाज सन २०१६-१७ | रु. ३६७ कोटी २० लक्ष | रु. १०६२ कोटी २९ लक्ष | रु. १४२९ कोटी ५० लक्ष | रु. १०८३ कोटी ५९ लक्ष | रु. ३४५ कोटी ९० लक्ष |
| मुळ अंदाज सन २०१७-१८ | रु. ३४५ कोटी ९० लक्ष | रु. १५२४ कोटी ३८ लक्ष | रु. १८७० कोटी २९ लक्ष | रु. १६७६ कोटी २३ लक्ष | रु. १९४ कोटी ५ लक्ष |

अखेर रु. १९४ कोटी ५ लक्ष असाधारण शिल्लक आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका राज्यातील झपाटयाने वाढणारे नागरी क्षेत्र म्हणून गणले जाते. मुंबई लगतचे क्षेत्र आल्याने वसई विरार शहराकडे तिसरी मुंबई म्हणून ओळख निर्माण झाली आहे. वाढती लोकसंख्या आणि झपाटयाने होणारे नागरीकरण याचा ताण शहराच्या पायाभूत सुविधांवर वाढत चालला आहे. त्याच प्रमाणे नागरीकांच्या महानगरपालिकेकडून नागरीसुविधाच्या अपेक्षा मोठया प्रमाणात वाढल्या आहेत. अंदाजपत्रक सादर करीत असतांना ते वास्तववादी संरचनात्मक दृष्टीने परिपूर्ण लेखासिध्दांतानुसार वर्गीकरण व परिणाम कारक असणे आवश्यक आहे.

वसई विरार शहराच्या वाढणाऱ्या नागरी समस्यांचा विचार करता त्या सोडवण्याच्या दृष्टीने उपाययोजनांसाठी मोठया प्रमाणावर निधींची आवश्यकता आहे आणि तो निधी उपलब्ध होण्याकरीता फक्त महानगरपालिकेचा निधी किंवा शासकिय अनुदाने यांचाच विचार न करता पी.पी.पी. /सी.एस.आर निधी इत्यादी मार्गाने काही प्रकल्प राबविण्यांत येत असून पुढील काही प्रकल्प हाती घेण्याचा मानस असून शहरातील सर्व घटकांचे सक्रिय सकारात्मक सहकार्य अपेक्षित आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महसूली उत्पन्न व दायित्व पहाता अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करतांना किमान नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे हे मोठे आवाहन असून महसूली उत्पन्नावर भर देऊन ते पुर्ण करावे लागणार आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सुनियोजित विकासाबाबत मी बांधिल आहे.

# महानगरपालिकेचे उत्पन्न प्रमुख स्त्रोत

१ **मालमत्ता कर** :- मालमत्ता कर , आगाऊ मालमत्ता कर , शास्ती, नोटीस फी व व्याज या पासुन सन २०१६-१७ मध्ये अपेक्षित उत्पन्न हे रु. १५४ कोटी ३१ लक्ष आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी नुसार वेळोवेळी सामान्य करामध्ये वाढ करणे आवश्यक होते. परंतू  मनपा स्थापनेपासून मालमत्ता करात वाढ झालेली नाही. असे असले तरी सन २०१७-१८ मध्ये ज्या मालमत्तांना कर आकारणी झालेली नाही, अशा मालमत्तांचे सर्वेक्षण पुर्ण झाले असून सन २०१७-१८ मध्ये अशा मालमत्तांना कर आकारणी करणे अपेक्षित असून त्यानुसार सन २०१७-१८ मध्ये मालमत्ता करापासून रु २१५ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| २ | **स्थानिक संस्थाकर** | :- | स्थानिक संस्था कर हा शासन निर्णयाव्दारे दि. १ ऑगष्ट २०१५ पासून ५० कोटी पेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापारी संस्थाना लागू आहे. यापासून सन २०१६-१७ मध्ये ९१ कोटी ४९ लक्ष अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये त्यापासून येणारे उत्पन्न रु. ९२ कोटी अपेक्षित आहे.<br>* स्थानिक संस्था कराचे शासन अनुदान सन २०१६-१७ मध्ये रु १९८ कोटी २४ लक्ष अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये रु. २१८ कोटी अपेक्षित आहे. |
| ३ | **जाहिरात कर** | :- | जाहिरात करापासून सन २०१६-१७ मध्ये रु. ४८ लक्ष ६१ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. विनापरवानगी सार्वजनिक ठिकाणी होर्डींग्ज लावले जातात जाहिरातीबाबतचे धोरण अंतिम टप्यात असून लवकरच अशा विनापरवानगी जाहिरात करणाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येऊन त्यांना नियमित जाहिरातकर लागूकरुन वसुल करता येईल व त्यामुळे जाहिरातकरापासूनचे उत्पन्नात वाढ होईल. त्यामुळे सन २०१६-१७ मध्ये ४८ लक्ष ६१ हजार व सन २०१७-१८ मध्ये जाहिरात करापासून रु. ३ कोटी ५० लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे. |
| ४ | **विशेष अधिनियमांखालील वसुली** | :- | नगर रचना विभागामार्फत छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रिमियम, टि.डी.आर. प्रिमियम, पुनर्वैधिकरण याबाबींपासून सन २०१६-१७ मध्ये रु. ४७ कोटी ९३ लक्ष ४ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे. सन २०१६-१७ मध्ये बांधकाम परवानगी प्रमाणे बांधकाम न केलेल्या प्रकरणांमध्ये दंड लावून नियमाप्रमाणे बांधकाम नियमित करणे कामी धोरणात्मक निर्णय घेण्याची प्रक्रिया चालू असून मा. महासभेपुढे सदरचा प्रस्ताव प्रस्तावित आहे. तसचे सन २०१७-१८ मध्ये विशेष अधिनियमांखालील रु. १२५ कोटी ७० लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.<br><br>महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील २१ गावांसाठी देखील वसई विरार शहर महागनरपालिकेस नियोजन व विकास प्राधिकरणाचे अधिकार प्राप्त झाले मुळे सन २०१६-१७ मध्ये रु. ४१ लक्ष २५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये रु. ३ कोटी ७२ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | **अग्निशमन सेवा** | :- | अग्निशमन सुरक्षा व विशेष अग्निसंरक्षण फी, विशेष अग्निशमन उपकर व अग्निशमन फी यापासून सन २०१६-१७ मध्ये रु. १४ कोटी ७३ लक्ष ५१ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये रु. १७ कोटी ३२ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे. |
| ६ | **वैद्यकिय सेवा** | :- | वैद्यकिय सेवांपासून सन २०१६-१७ मध्ये रु. १ कोटी ९ लक्ष ९७ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच २०१७-१८ मध्ये रु. २ कोटी ५७ लक्ष ५० हजार उत्पन्न अपेक्षित आहे. |
| ७ | **विशेष स्वच्छता कर** | :- | महानगरपालिकेच्या हद्दितील समाविष्ठ नगरपालिका क्षेत्र मधील मालमत्ता धारकांना समान दराने विशेष स्वच्छता कर आकारण्यात आला आहे. सन २०१६-१७ मध्ये रु. १३ कोटी ७७ लक्ष ६९ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये रु. १४ कोटी २० लक्ष २४ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. |
| ८ | **पाणी पुरवठा** | :- | पाणी पट्टी सन २०१६-१७ मध्ये रु. ४७ कोटी ७७ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये ६२ कोटी अपेक्षित आहे.<br>पाणी पुरवठया पासून सन २०१६-१७ मध्ये रु. ६९ लक्ष ४८ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये रु. १ कोटी ५२ लक्ष २५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे.<br>पाणी पुरवठा स्त्रोत विकास आकार या पासून २०१६-१७ मध्ये रु. २७ कोटी ८५ लक्ष ४६ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये रु. ३० कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. |
| ९ | **वृक्ष कर** | :- | वृक्ष करापासून सन २०१६-१७ मध्ये रु. २ कोटी ६७ लक्ष १७ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये २ कोटी ७० लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे. |
| १० | **अनुदाने** | :- | मुद्रांक शुल्क अनुदान, जमिन महसुल अनुदान, बिन शेतसारा अनुदान, करमणूक कर अनुदान, वाचनालय अनुदान, रस्ते परिक्षण अनुदान, एकात्मिक तलाव संवर्धन अनुदान, मत्स विकास योजना अनुदान, दलित वस्ती सुधारणा अनुदान, सुजल निर्मल योजना अभियान अनुदान, |

सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अनुदान, सॅटेलाईट सिटी अनुदान, अमृत योजना अनुदान, वसई विरार शहर महानगरपालिकेस सर्वसाधारण/योजना निहाय अनुदान प्राप्त होते. सन २०१६-१७ मध्ये रु. २३६ कोटी ३३ लक्ष ३६ हजार अनुदान अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये रु. १५८ कोटी ८० लक्ष ६८ हजार अनुदान अपेक्षित आहे.

**११ इतर उत्पन्न** :- सिनेमा/प्रयोग व खेळावरील कर, कॉम्प्याक्टर /टिप्पर इतर वाहन भाडे, महानगरपालिका मालमत्तांपासूनचे भाडे, गाळा भुईभाडे, अतिक्रमण हटविणे/अनधिकृत बांधकाम तोडणे कामी प्रशासकिय शुल्क, बाजार फी/हातगाडी फी, मासे संवर्धन तलाव लिलाव/ नौकाविहार, गुंतवणुकीवरील व्याज/बचत खाते व्याज, दंड, निविदा फॉर्म इतर महानगरपालिका प्रकाशने, रस्ता खोदाई शुल्क व इतर यापासून सन २०१६-१७ मध्ये रु. ५१ कोटी ५५ लक्ष ८ हजार उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये रु. ५७ कोटी ६६ लक्ष २ हजार उत्पन्न अपेक्षित आहे.

**१२ कर्ज** :- महानगरपालिकेस विशेष योजना निहाय केंद्र व राज्यशासनाकडून योजना निहाय अनुदान प्राप्त होते. या योजनांसाठी महानगरपालिकेचा हिस्सा पोटी योजना खाती निधी वर्ग करावा लागतो. अशाप्रकारे महापालिकेत योजना राबवितांना एकत्रित मोठा निधी आवश्यकता लागणार आहे. महापालिकेच्या अमृत योजनंअंतर्गत शहरांतर्गत जलवाहिनी व्यवस्था, सॅटेलाईट सिटी अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा १ ते ३, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत, रिंग रोड, जुचंद्र रुग्णालय, महानगरपालिका मुख्यालय इमारत उड्डानपुल, बायोमायनिंग, सि ॲण्ड डी वेस्ट, इत्यादी योजना करीता सन २०१७-१८ मध्ये रु. २९० कोटी कर्ज उपलब्ध करणेची तरतुद आहे.

# महसुली व भांडवली खर्च बाबी

**१) आस्थापना खर्च :-**

महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील आकृतीबंधानुसार रिक्त असलेली पदे आवश्यकतेनुसार भरली जाणार आहेत. महानगरपिालकेच्या विस्तीर्ण कार्यकक्षेचा विचार करता आवश्यक सुविधा पुरवणेसाठी झोन निहाय साफसफाई ठेक्यासह प्रशासकीय, तांत्रिक, नियोजन, विकास, अग्निशमन, पाणीपुरवठा, आरोग्य, वैद्यकिय आरोग्य, दिवाबत्ती, वाचनालय, शिक्षण, कर वसुली इ. जवळपास सर्व कामांसाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्रपणे अभिकर्ता नेमून सेवा पुरवणेची तरतुद आहे.

| लेखाशिर्ष | तरतुद (आकडे लाखात) | |
|---|---|---|
| | सन २०१६-१७ | सन २०१७-१८ |
| स्थायी आस्थापना वेतन व भत्ते | ४६९४.९० | ५४८४.७० |
| रोजंदारी आस्थापना वेतन व भत्ते | २२.४१ | २३.०० |
| साफसफाई व्यतिरिक्त कर्मचारी पुरवणेचा ठेका | ४६००.५७ | ६०५४.६३ |
| कर्मचाऱ्यांसाठीचे इतर लाभ | ६६४.२९ | ८२२.९२ |
| इतर प्रशासकिय खर्च | २५२२.४३ | ३३२३.७४ |
| महानगरपालिका सदस्यांसाठीचा खर्च | २२०.२९ | २३५.०० |
| **एकूण** | **१२७२४.८९** | **१५९४३.९९** |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | **नगर रचना** | :- | ऑटो डि.सी.आर./ऑटोकॅड/ स्टॉम वॉटर ड्रेनेज मास्टर प्लान या लेखाशिर्षाखाली नगररचना विभागामार्फत सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात केंद्र शासनाच्या ऑनलाईन इमारती बांधकाम परवाना योजने अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेची निवड झालेली आहे. सबब याकामी ऑटो डी.सी.आर प्रोग्राम तयार करणे व त्या संबंधित कामे एजन्सी मार्फत करावयाची प्रक्रिया लवकरच करण्यांत येणार आहे. त्यासाठी सन २०१६-१७ मध्ये रु. १ कोटी खर्च अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये रु. ४ कोटी इतकी तरतुद आहे.<br>जी.आय.एस. मॅपींग/लॅन्ड युज अपडेशन, व सि.आर.झेड सर्वेक्षण कामी, स्कॅनींग व आकास्मीक खर्च यासाठी सन २०१६-१७ मध्ये रु. १ कोटी ४९ लक्ष २२ हजार खर्च अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये ४ कोटी ८० लक्ष इतकी तरतुद आहे. |
| ३ | **पथदिप व विद्युत व्यवस्था** | :- | शहरातील पथदिप व्यवस्थापन, सिग्नल व्यवस्था, अपारंपारीक ऊर्जास्त्रोत निर्मिती, रोहित्र खरेदी, उद्वहन दुरुस्ती, विद्युत देयक, पोल स्थलांतर, नविन पोल उभारणे/ भुमिकत केबल व्यवस्था/ टायमर व्यवस्था, दिवाबत्ती विभागासाठी वाहन खरेदी, ध्वनीक्षेपण यंत्रणा व इतर दिवाबत्ती व्यवस्था, इत्यादीसाठी सन २०१६-१७ मध्ये रु. २७ कोटी ५४ लक्ष ६१ हजार खर्च अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये रु ४० कोटी ९२ लक्ष ४१ हजार इतकी तरतुद करण्यांत आली आहे. |
| ४ | **अग्निशमन व्यवस्था** | :- | महानगरपालिकेकडे एक मुख्य अग्निशमन केंद्र अतिअद्यावत, दोन उप अग्निशमन केंद्र अद्यावत व तीन अग्निशमन केंद्र साधारण आहेत. त्याद्वारे मनपा क्षेत्र तसेच लगतचे क्षेत्रामध्ये अग्निशमन व बचावकार्य करण्यांत येते. यासाठी लागणारे आवश्यक यंत्र सामुग्री व इतर खर्च यासाठी सन २०१६-१७ मध्ये रु. २ कोटी ३६ लक्ष २० हजार खर्च अपेक्षित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये रु. ३५ कोटी ५६ लक्ष ७५ हजार इतकी तरतूद करण्यांत आली आहे. |
| ५ | **शहर स्वच्छता/ आरोग्य सोयी** | :- | वसई विरार शहर महानगरपालिका शहर स्वच्छता विभागामार्फत विविध योजना प्रभावी पणे राबविल्या जात असून ज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजन, स्वच्छता विषयक जनजागृती, नाले सफाई, डंपिंग ग्राऊंड व्यवस्था, सॅनीटरी लॅडफील व्दारे कचऱ्याची विल्हेवाट लावणे, स्प्रे पंप |

मशिन खरेदी, मालमत्तांच्या व्हेंट पाईपवर जाळी बसवणे, शुन्य कचरा अभियानांतगत सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर ५०० मीटर क्षेत्रासाठी एक कामगार २ पाळयामध्ये नियमीत उपलब्ध करणे यासह शहर स्वच्छता विभागास आवश्यक सर्व इतर खर्चासाठी तरतूदी उपलब्ध आहेत. रस्त्यावरील केरकचरा व इतर साफसफाई करिता सन २०१६-१७ रु. १५३ कोटी ७७ लक्ष ६ हजार व सन २०१७-१८ रु. १४७ कोटी ४० लक्ष २८ हजार तरतुद आहे.

६ **रुग्णालयीन सेवा (वैद्यकिय आरोग्य)** :- महापालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये सध्या सर डी. एम. पेटीट, वसई, तुळींज रुग्णालय, नालासोपारा, माता बालसंगोपन केंद्र, सातिवली याशिवाय एकवीस नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आठ दवाखाने यामार्फत रुग्णालय सेवा उपलब्ध केल्या आहेत. संपूर्ण रुग्णालयाचे आधुनिकीकरण करणेत आले असुन, महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी अधिक भर देण्यात आला असून तद्नुसार वाढीव तरतुदी प्रस्तावित आहेत. महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णांसाठी श्वानदंश व सर्पदंश इंजेक्शन मोफत देणे, अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या व्यक्तीसाठी समुपदेशन करुन उपचार करणे व जनजागृती करणे तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयात जेनेरीक मेडीसीन उपलब्ध करणेची तरतुद आहे. महानगरपालिकेचे कर मुदतीत भरणाऱ्यांना हेल्थ कार्ड उपलब्ध करुन देऊन महानगरपालिकेच्या रुग्णालयात रक्त तपासणी, इ.सी.जी., एक्सरे, इत्यादी, आवश्यक तपाणीसाठी सर्वसामान्यांना ५०% तसेच अंध अपंग व महिला व बालकांना १०० % सवलत देणेची तरतुद आहे. प्रसुती विभागातील रुग्णांना पोषण व आरोग्य भत्ता, मोफत रुग्णवाहिका सेवा, महानगरपालिका रुग्णालयात उपलब्ध असलेल्या सर्व वैद्यकिय चाचण्या मोफत करणे इत्यादी सुविधा उपलब्ध असून प्रसुती विभागातील सर्वच प्रकारच्या रुग्णालयीन सेवा सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे. तसेच दोन रुग्ण वाहिका बँकेमार्फत सी. एस. आर. मधून उपलब्ध झाल्या आहेत. रुग्णालय व्यवस्थापनासाठी सन २०१६-१७ मध्ये रु. २० कोटी १२ लक्ष ६७ हजार व सन २०१७-१८ मध्ये रु. ४१ कोटी १२ लक्ष तरतुद आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | **आपत्ती व्यवस्थापन** | **:-** | आपत्कालीन कालावधीत विशेष सेवा पुरविणेसाठी उपाययोजना करणे, आपत्कालीन परिस्थितीत तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करणेसाठी ट्रांझीट कॅम्प, अग्निशमन अनुदानांतर्गत आपत्ती निवारणकेंद्र उभारणे, आपत्कालीन परिस्थिती नियंत्रणासाठी पोलिस मदतीसह हेलिकॅप्टर भाडे, कृती आराखडा तयार करुन तदनुसार आवश्यक ती व्यवस्था करणेसाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करणे यासाठी व इतर आपत्कालीन व्यवस्थेसाठी आवश्यक तरतुद आहे.<br>**महापौर सहाय्यता निधी :-** महानगरपालिका निधीतून गरीब गरजूना आर्थिक मदत करताना विशेष बंधनाशिवाय आर्थिक सहाय्य देता यावे हा या निधीचा प्रमुख उद्देश आहे. महापौर सहाय्यता निधीसाठी महानगरपालिका निधीतून संस्था अनुदाने या शिर्षाअंतर्गत प्रतिवर्षी रु. २५ लक्ष उपलबध करुन देण्याची तरतूद आहे. सन २०१६-१७ मध्ये. रु. ३ कोटी ११ लक्ष २ हजार व सन २०१७-१८ मध्ये. रु. ६ कोटी ५६ लक्ष तरतुद आहे. |
| ८ | **सर्व धर्मियांसाठी दहन व दफनभुमी व्यवस्था** | **:-** | महानगरपालिका क्षेत्रातील दहन भुमींमध्ये महानगरपिालका लगतचे क्षेत्रातील व्यक्तींचेदेखील अंत्यसंस्कार केले जात असुन अशा सर्व अंत्यसंस्कारासाठी देखील प्रेत दहनाकरीता लाकडे मोफत उपलब्ध करुन देणे देणेची तरतुद आहे. महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख दहनभुमींचे ठिकाणी विद्युत व गॅस दाहिनी व्यवस्था मोफत उपलब्ध करुन देऊन पर्यावरण संरक्षण करणेसाठी प्रयत्न केले जात असून, विद्युत दाहिनी व गॅस दाहिनींचा वापर करणेस प्रवृत्त करणेस प्रत्येक अंत्यसंस्कारासाठी प्रारंभ काळात मयत व्यक्तीचे निकटतम गरीब गरजू नातेवाईकास ठोक रु. १ हजार अर्थसहाय्य अंत्यसंस्काराच्या वेळी अथवा अतिशिघ्र घरपोच देणेचा प्रस्ताव आहे.<br>दहन भूमीचा इतर नागरिकांना होणारा त्रास विचारात घेऊन दहन भूमीचे सुशोभिकरण करणे, सदर ठिकाण उद्यान कारंजे, वाचनालय इत्यादी सुविधा उपलब्ध करणे, पुरेशा उंच संरक्षक भिंतीची व्यवस्था करणे, सर्व धर्मीयांसाठी भुसंपादनासह दफनभूमी विकसित करणे तसेच उपलब्ध दफन भूमींच्या विकास व सौदर्यीकरण इत्यांदीसाठी बांधकाम विभागांतर्गत वरील प्रमाणे दहन दफनभूमीच्या एकूण व्यवस्थेसाठी सन २०१६-१७ मध्ये रु. १० कोटी ६५ लक्ष ९३ हजार व सन २०१७-१८ मध्ये रु. १२ कोटी ५ लक्ष ८६ हजार तरतुद आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | **उद्यान व्यवस्था** | **:-** | महानगरपालिका क्षेत्रातील विविध उपलब्ध ठिकाणी अबाल वृध्दांसाठी बालोद्यान, सर्वसाधारण उद्यान, विद्या उद्यान, वनस्पती उद्यान, जॉर्गस पार्क इत्यादी विकसित करण्याचा संकल्प असून उद्यानामध्ये खेळणी, क्रिडा साहित्य, म्युझीकल सिस्टीम, इलेक्ट्रीक फिटींग, बैठक व्यवस्थेसाठी बाकडे, कारंजे व्यवस्था इत्यादी विविध उद्यान विषयक बाबींसाठी तरतुदी असून महिला संक्षमिकरणासाठी उद्यानांची देखाभाल करणे कामी मनपा कार्यक्षेत्रातील म.बा.क. विभागात नोंदणी असलेल्या नोंदणीकृत असलेल्या महिला बचत गटांना देण्यांत आले आहे. उद्यानात तुषार सिंचन/ठिबक सिंचन पध्दती बसविणेचे काम प्रगतीपथावर आहे. याकामी सन २०१६-१७ मध्ये रु. १७ कोटी १६ लक्ष ७९ हजार व सन २०१७-१८ मध्ये रु. २२ कोटी ४ लक्ष ४५ हजार तरतुद आहे. |
| १० | **सांस्कृतिक भवन व समाजमंदिर व्यवस्था** | **:-** | सांस्कृतिक भवन व समाजमंदिर व्यवस्थेसाठी सन २०१६-१७ मध्ये रु. २८ लक्ष ९५ हजार व सन २०१७-१८ मध्ये रु. २९ लक्ष ५५ हजार तरतूद आहे. |
| ११ | **मार्केट व्यवस्था** | **:-** | मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर यांच्या विशेष पाठपुराव्याने मत्स्य विकास महामंडळाकडून प्राप्त अनुदानातून आगाशी व बोळींज येथे मच्छी मार्केट तयार झाले असून सोपारा येथील मच्छी मार्केट पुर्ण होत आहेत. विरार येथील भाजी मार्केट व मच्छी मार्केट महानगरपालिकेने बांधलेल्या इमारतीत स्थलांतरीत करण्यात आले आहे. शहरात विविध ठिकाणी शितगृहाच्या व्यवस्थेसह ओले मासळी मार्केट मटन मार्केट, सुकी मासळी मार्केट, भाजी मार्केट, फुल मार्केट इत्यादी मार्केट व बहुउद्देशिय मंडईच्या विकासासाठी सन २०१६-१७ मध्ये रु. ११ कोटी ८ लक्ष ५० हजार व सन २०१७-१८ मध्ये रु. १० कोटी ९ लक्ष तरतूद आहे. |
| १२ | **तलाव व्यवस्था** | **:-** | विरार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तलाव, ॲड. सि.पी. सोलंकी परिक्रमा व नौकाविहार केंद्र तसेच नालासोपारा येथील चक्रेश्वर तलाव, आचोळे तलाव, नानभाट तलाव, जूचंद्र तलाव, बर्फेश्वर तलाव विकसित करण्यात आलेले असून एकात्मिक तलाव संवर्धन योजनंतर्गत प्राप्त |

अनुदानातून निर्मळ तलाव येथे जॉगींग ट्रॅक, ग्रीन वॉल, ग्रीन हाऊस, धोबी घाट, विसर्जन घाट, सोलार पावर सिस्टीम लेझर शो, विरंगुळा केंद्र, माहि महोत्सवाच्या धर्तीवर म्युझीयम तयार करणेत येत असुन यासह चेन ऑफ लेक नुसार पापडी तलाव, तामतलाव इ. शहरातील विविध तलावांचे पुनर्जितीतीकरण व सुशोभिकरण करणे, निर्माल्य कलश व्यवस्था करणे इत्यादी कामी सन २०१६-१७ मध्ये रु.२२ कोटी २६ लक्ष ७८ हजार व सन २०१७-१८ मध्ये रु. ४० कोटी ९८ लक्ष ४३ हजार इतकी तरतूद आहे.

१३ **बांधकाम व्यवस्था :-** बांधकामाच्या महसुली खर्च विषयक बाबी, दुरुस्ती विषयक बाबी, नविन कामे इ. साठी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद आहेत. इमारत दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती इतर बांधकामांची दुरस्ती देखभाल, रस्ते सौदर्यीकरण, कॅटआय रिफ्लेक्टर व्यवस्था, कामगार निवास दुरुस्ती, विशेष तांत्रिक कामांसाठी तांत्रिक सल्लागारामार्फत बांधकामचे नियोजन व अंदाजपत्रक तयार करुन नियंत्रण ठेवणे, भुमापन खर्च, संरक्षक भिंत बांधकाम दुरुस्ती, हुतात्मा स्मारके व ऐतिहासिक स्मारक देखभाल, प्रशासकिय इमारती नुतनीकरण, आयुक्त निवास, पुढील पाच वर्षाच्या दुरुस्ती देखभालीच्या जबाबदारीसह विविध ठिकाणी सिमेंटचे रस्ते, डांबरी रस्ते व नविन रस्त्यांसाठी खडीकरण तसेच पदपथ व्यवस्था, गटार बांधकाम, भुमिगत गटार व्यवस्था, नाला व मोरी बांधकामे, गटारावर चेंबर्स व्यवस्था सार्वजनिक शौचालय व मुतारी बांधकामे, भुसंपादीत आरक्षित जागांचा विकास, प्रवाशांसाठी रात्र निवारा गृह उपलब्ध करणे, बहुमजली पार्किंग योजना, क्रिडा संकुल बांधणे, महत्वाच्या ठिकाणी दिशादर्शक फलक व स्वागत कमानी, अल्पसंख्याक बहुल क्षेत्र विकासकामे, महापौर निधी अंतर्गत त्यांचे शिफारशी नुसार व प्रभाग समिती स्तरावर प्रभाग समिती निधीतील आवश्यक कामे, वैशिष्टयपूर्ण कामे व मुलभूत सुविधा विषयक कामासठी प्राप्त विशेष निधीतील कामे करणे यासह मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर यांच्या निधीतील कामांसह, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर मा. आमदार विलसजी तरे यांच्या निधीतील कामे बंदर विकास कामांतर्गत मच्छीमार / कोळी बांधवांसाठी व्यवस्थाय वृध्दीकरिता शितगृह व्यवस्था, बर्फ कारखाना, मासळी सुकवण्यासाठी चौथरा बांधकाम, जेट्टीच्या जोडरस्त्याचे कॉक्रिटीकरण, उतरता धक्का बांधणे, धुप प्रतिबंधक बंधारे व समुद्र किनारी संरक्षक भिंती उभारणे इत्यादी विविध

विकासकामांसाठी सन २०१६-१७ मध्ये रु. २०४ कोटी ८७ लक्ष ३९ हजार व २०१७-१८ मध्ये रु. ३५४ कोटी ३६ लक्ष ९३ हजार इतकी तरतूद आहे.

१४ **शिक्षण व्यवस्था** :- जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा ताब्यात घेणे, पुर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण व्यवस्थापनासह माध्यमिक शिक्षणंतर्गत मराठी, हिंदी गुजराथी व उर्दु माध्यमाच्या शाळांना सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी थंड पिण्याच्या पाण्यांची यंत्रे, क्रिडा साहित्य, प्रयोग शाळेतील साहित्य, विद्युत/ इनव्हर्टर व्यवस्था इ. साधन सामुग्री पुरविणे या बाबींसाठी आवश्यक तरतूद, शाळागृह इमारतीची दुरुस्ती, जिल्हा परिषदेच्या शाळा प्रत्यक्ष महानगरपालिकेच्या ताब्यात येईपर्यंत प्राथमिक शिक्षण निधीची तरतूद तसेच देय प्राथमिक शिक्षण अंशदानाच्या तरतुदीमधून यापूर्वी अदा केलेली प्राथमिक शिक्षण निधीची रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कमेतून प्रत्यक्ष महानगरपालिकेमार्फत शालेय व्यवस्थापन इत्यादी बाबींसाठी व प्राथमिक व माध्यमिक शालेय शिष्यवृत्ती परिक्षा व इतर स्पर्धा परिक्षांमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या सर्वसाधारण प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर पारितोषिके देणेकामी सन २०१६-१७ मध्ये रु. ६६ लक्ष ५० हजार व सन २०१७-१८ मध्ये रु. १ कोटी ७० लक्ष २ हजार इतकी तरतुद आहे.

१५ **वाचनालय व्यवस्था** :- चंदनसार प्रभाग समितीतील सार्व. वाचनालय, विरार येथे बॅकेने सी.एस.आर. द्वारे अत्याधुनिक इ-ग्रंथालयाचे काम अंतिम टप्यात आले आहे. तसेच शहरपातळीवर विविध ठिकाणी वाचनालय व अभ्यासिका व्यवस्था उपलब्ध करणे, पुर्वीच्या शहरी भागातील वाचनालयांचा दर्जा सुधारणे, संस्था अनुदानांतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील ग्रंथलयांना अनुदान देणे, वाचनालय व अभ्यासिका वर्षभर १२ तास सुरु ठेवणे, शुध्द व थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, सुरक्षा रक्षक, वाळवी प्रतिबंधक किटकनाशके फवारणी करुन व पुस्तके बांधणी करुन पुस्तकांचे जतन करणे, संपुर्ण संगणकीकरणाअंती केंद्रीय ठिकाणी इ-ग्रंथालय व शहर वाचनालय सुरु करणे इत्यादी बाबींसाठी सन २०१६-१७ मध्ये रु. ८४ लक्ष २२ हजार व २०१७-१८ मध्ये रु. १ कोटी १३ लक्ष ६० हजार इतकी तरतूद आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | **माहिती तंत्रज्ञान (संगणक विभाग)** | :- | महानगरपालिकेत ई-गव्हर्नन्स अंमलबलावणी करणे आली असुन महानगरपालिकेची अद्यावत वेबसाईट, ऑनलाईन कर भरणा, राईट टु सर्विस या योजनेअंतर्गत दाखले ऑनलाईन पध्दतीने देणे, ई- निविदा कार्यवाही, जन्म - मृत्यु नोंदणी, टपाल नोंदणी, रुग्णालयासाठी संगणक अज्ञावली तयार करणे. इ. संगणकीय सेवा देणेचे काम सुरु झाले आहे. संगणक प्रणाली / आज्ञावली विकसीत करणेत आली आहे. स्वतंत्र संगणकीय व्यवस्थापन केंद्राच्या निर्मीती व संगणक प्रणाली दुरुस्ती देखभाल खर्चासहीत सन २०१६-१७ मध्ये रु.२ कोटी ७८ लक्ष ६७ हजार व सन २०१७-१८ मध्ये रु. ७ कोटी १९ लक्ष ५६ हजार इतकी तरतुद आहे. |
| १७ | **सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम** | :- | स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, शिवजयंती, महात्मा गांधी जयंती व साविञीबाई फुले इतर थोर राष्ट्रपुरुषांच्या जयंती इत्यादी कार्यक्रमासह वसई विजयोत्सव, गणेशोत्सव, नवराञोत्सव, दिपोत्सव, दिपावली पहाट, पावसाळी संध्याकाळ, दिपावली संध्या, नाताळ गोठा, ईद-ए-मिलाद इ. इतिहास व संस्कृती जोपासना करणारे कार्यक्रम, सत्कार उत्सव समारंभ, व्याख्यानमाला व वकृत्व स्पर्धा , ग्रंथ संमेलन, गुणवंत शिक्षक सत्कार, विद्यार्थी गुणगौरव, महापौर चषक स्पर्धा, इत्यादी साठी सन २०१६-१७ मध्ये रु. २ कोटी ४ लक्ष ४५ हजार व २०१७-१८ मध्ये रु.२ कोटी ३५ लक्ष ९० हजार इतकी तरतुद आहे. |
| १८ | **युवकांसाठी विशेष कार्यक्रम** | :- | युवकांसाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रम, वाचनमाला व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, खुल्या प्रवर्गातील दहावी व बारावीमधील गुणानुक्रमे प्रथम दहा विद्यार्थ्याना शिष्यवृत्ती व पारितोषिक, महिला बाल कल्याण समितीमार्फत शालेय विद्यार्थांना सायकलीचे वाटप तसेच महिला बाल कल्याण समितीमार्फत सामुदायीक विवाह सोहळ्या अंतर्गत वर पक्षास अनुदान व इतर युवककल्याणाच्या योजना सन २०१६-१७ मध्ये रु. २ कोटी ६८ हजार व २०१७-१८ मध्ये रु. २ कोटी इतकी तरतुद आहे. |
| १९ | **क्रिडा विषयक** | :- | (i) प्रभाग समिती निहाय शालेय कलाक्रिडा महोत्सवासाठी (ii) वसई तालुका कलाक्रिडा महोत्सव समितीस तसेच जिमखाना व्यायामशाळा यांचे |

कार्यक्रम संचालन करणाऱ्या संस्थांसह इतर क्रिडा संस्थाना अनुदान देणे.

(iii) महापौर मॅरेथॉन स्पर्धेस मिळालेला प्रतिसाद, यशस्वीतता व प्रत्यक्ष खर्चाचा विचार करुन मागील थकीत देयकासह .

(iv) खेळ व संघ दत्तक घेणे, महिला खेळाडू, बालके, युवक व वरिष्ठ नागरीक यांच्या क्रिडा विषयक विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर शासन मान्य स्पर्धासाठी शालेय विद्यार्थ्याचे क्रिडासंघ पाठवणेसाठी प्रायोजकत्व स्विकारणे, यासाठी महानगरपालिकेचे क्रिडासमिती नियुक्त करुन खेळाडू, प्रशिक्षक व संघ सदस्यांना लागणारे क्रिडा साहित्य गणवेश / टी शर्ट, प्रवास खर्च व इतर अनुषांगीक खर्चासाठी अर्थसहाय्य मजुर करणे, भारतीय ऑलिंपिक संघटना, सर्व खेळांच्या अधिकृत राष्ट्रीय क्रिडा संघटना व सर्व खेळांच्या अधिकृत राज्य संघटनांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय अजिंक्य पदाच्या क्रिडा स्पर्धा व राष्ट्रीय अजिंक्य पदाच्या शालेय क्रिडा स्पर्धा यामधील रौप्य, कांस्य व सुवर्ण पदके मिळवणाऱ्या स्पर्धकांना क्रिडासाधना, क्रिडा संजिवनी योजनेअंतर्गत रु. १० हजार ते रु. १ कोटी पर्यंतची बक्षिसे देणे व त्यांचा गौरव करणे, नवघर येथे वातानुकूलीत व्यायामशाळा व रायफल शुटींग प्रशिक्षण सुरु करणेसह वर्ल्ड कप, ऑलिंम्पीक, एशियाड, राष्ट्रकुल, राष्ट्रीय व इतर तत्सम स्पर्धांमध्ये निवड झालेल्या खेळांडूंना प्रोत्साहन पर रक्कम प्राथमिक खर्चासाठी मदत स्वरुपात अदा करणे तसेच शासनमान्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धा, ऑलींम्पीक स्पर्धा यामध्ये सहभाग घेणेसाठी निवड झालेल्या खेळाडू व संघाना अर्थसहाय्य करणे इत्यादी कामी.

(v) क्रिडा प्रबांधिनी व क्रिडा व्यवस्थापन. तसेच नविन क्रिडांगणसाठी भूसंपादनासह स्टेडियम बांधकाम व इतर क्रिडांगण विषयक कामांसाठी सन २०१६-१७ मध्ये रु.७ कोटी १ लक्ष ५७ हजार व २०१७-१८ मध्ये रु. १६ कोटी ५७ लक्ष ४५ हजार इतकी तरतूद आहे.

२० **संस्था अनुदाने** :- विश्वस्त नोंदणकृत रुग्णालय, निराधार व निराश्रीत मुली व महिलांसाठी कार्य करणाऱ्या संस्था व इतर संस्थांचा सामाजिक विकासातील अमुल्य सहभाग विचारात घेता अशा संस्थाना त्यांचे विशेष कार्यासाठी प्रोत्साहन देणेकामी अनुदान देणे तव्दतच विविध वर्गाच्या ग्रंथालयांना नियमीत तसेच जेष्ठ नागरीक व विद्यार्थ्यांना विनाशुल्क सेवा उपलब्ध करुन देणाऱ्या ग्रंथालयासाठी विशेष दराने अनुदान देणेकामी सन २०१६-१७ मध्ये रु.

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ८४ लक्ष २२ हजार व २०१७-१८ मध्ये रु. १ कोटी १३ लक्ष ६० हजार इतकी तरतूद आहे. |
| २१ | **अंध अपंग व मतीमंदकरीता कल्याणकारी योजना** | :- | उपलब्ध स्कायवॉक व उड्डाणपुलांजवळ अपंगासाठीसरकते जिने व उव्दाहक, विविध महत्वांच्या सार्वजनिक ठिकाणी रॅम्पीची व्यवस्था व इतर अपंग कल्याणकारी याजनांच्या भांडवलल खर्चासह अंध, अपंग, मतीमंदाचे कल्याणासाठी कार्य करणाऱ्या बोळींज येथील अपंग पुर्नवसन केंद्रासह इतर संस्थाना अनुदान, विशेष बालकांसाठी महिला बालकल्याण मध्ये असलेल्या तरतुदी व्यतिकरक्त अंध, अपंग व्यक्ती कल्याणकारी योजने अंतर्गत ३ चाकी सायकली तसेच इतर आवश्यक साहित्याचे वाटप, अंध,अपंग, मतीमंद अथवा त्यांच्यातील अवलंबीताच्या विवाहासाठी सामुदयीक विवाह सोहळ्या अंतर्गत अतिरीक्त अर्थसहाय्य, अपंगत्वाचे आवश्यक दाखले मिळवून देण्यासाठी स्थानिक ठिकाणी विशेष शिबीरांचे आयोजन यासाठी सन २०१६-१७ मध्ये रु. २ कोटी ४ लक्ष १२ हजार व २०१७-१८ मध्ये रु. ५ कोटी २ लक्ष इतकी तरतूद आहे. |
| २२ | **पाणी पुरवठा व्यवस्था** | :- | सद्या आपल्या शहराला १३० एम. एल.डी. पाणीपुरवठा होत असुन नविन सुर्या प्रकल्पातून जवळपास १०० एम. एल. डी. पाणीपुरवठा होणार आहे. सदर योजनेत उद्‌भवलेल्या सर्व तांत्रिक अडचणी उदा. वनखात्याची परवानगी , खाजगी मालकीच्या जागा, अतिक्रमण इ. बाबी दुर झाल्या असुन काम युध्द पातळीवर चालू आहे. ३१ मार्च २०१७ पर्यंत प्रत्यक्ष पाणी उपलब्ध होणार आहे.<br>देहरजी धरणातून जवळपास ३०० एम. एल. डी. पाणीपुवठा होणार असू त्याचबरोबर पिंजळ येथे ८ बंधारे, वैतरणा नदीवर ८ बंधारे, देहरजी नदीवर ६ बंधारे असे २२ बंधारे बांधल्यावर १०० एम.एल.डी. पाणी उपलब्ध होणार आहे.<br>२०० एम. एल. डी. पाणीपुरवठा करणारे सुसरी धरण शासनाकडून बांधणे येणार असुन मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणाऱ्या सुर्या योजनेतून १८५ एम. एल.डी. पाणीपुरवठा होणार आहे.<br>सातिवली, राजावली, कामण, खोलसापाडा, तिल्हेर, हत्तीपाडा, या प्रकल्पांचे सर्व्हेक्षण करणेसाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.<br>१८० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा करणाऱ्या सुसरी धरणासाठी रु. १६ काटी इतकी रक्कम महानगरपालिकेने भरणा केली असून सातिवली |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | राजीवली धरण योजनेस साठवण तलाव बांधकाम करणेसाठी चाचणी निष्कर्ष अन्वेषण, संकल्पन व वनजमिनी प्रस्ताव तयार करुन मंजुरी इ. प्राथमिक खर्चाकरीता प्रत्येकी रु. १ कोटी प्रमाणे रु. २ कोटी इतका निधी महानगरपालिकेने प्रत्यक्ष भरणा केला आहे व देहरजा योजनेसाठी एन. पी. व्ही. भरणेसह इतर कामाकरीता रु. १६५ कोटी इतकी रक्कम भरणा केली आहे. सन २०१७-१८ मध्ये रु. ७५ कोटी इतकी तरतुद आहे.<br>सुर्या नदी पात्रात ५ ठिकाण बंधारे बांधणे तसेच कवडास धरणाची उंची वाढवुन व गेट बांधून एकूण १०० दश लक्ष लिटर चा प्रकल्प राखुन ठेवणेसाठी प्रयत्न सुरु आहेत. यासाठी सर्व्हेक्षण व प्राथमिक खर्चासाठी रु. २० लक्ष इतका निधी महानगरपालिकेने भरणा केला आहे.<br>प्रति दिन २३ दश लक्ष लिटर पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकणारे राजीवली सातीवली धरण व प्रतिदिन ७० दश लक्ष लिटर पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकणारे कामण धरण, १२ दश लक्ष लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा करणारे खालसापाडा धरण तसेच श्धामणी व खडकवली धणावरील योजनांचा पाठपुरावा करुन एकूण ४१५ दश लक्ष लिटर पाणीस्त्रोत उपलब्ध करणेसाठी प्रयत्न सुरु आहेत.<br>पाणीपुरवठा सेवेसाठी सन २०१६-१७मध्ये रु. ११० कोटी ५० लक्ष ५७ हजार इतकी तरतुद असुन सन २०१७-१८ मध्ये रु. १७९ कोटी ८४ लक्ष ७ हजार इतकी तरतुद आहे. |
| २३ | **नाले खोदाई** | :- | पावसाळी पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होऊन शहरामध्ये पाणी तुबून राहून ये यासाठी नियमीत नाले सफाईसह पावसाळ्यापूर्वी यांत्रिक साहित्याव्दारे नाले खोंदाई करणेकामी सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये अनुक्रमे रु. ५ कोटी ५० लक्ष रु. ६ कोटी ५० लक्ष इतकी स्वतंत्र तरतुद आहे. |
| २४ | **महिला बालकल्याण कार्यक्रम** | :- | महिला बालकल्याण यांचेसाठी महानगरपालिका क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यांत येत आहेत. यामध्ये बालवाडी, प्राथमिक , माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपकरणे, वहया पुस्तके व खेळणी खरेदी, शाळांच्या आवश्यकतेनुसार संगणक पुरविणे, विशेष बालकांसाठी साहित्य पुरविणे व विशेष बालकांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देणे, शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी मोफत शैक्षणिक पास योजना, |

नागरी गरीब विद्याथी व विद्यार्थीनींसाठी सायकली वाटप, शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम, नोकरदार महिलांसाठी वसतीगृह निराधार महिलांसाठी तात्पुरते निवारा केंद्र व जेष्ठ महिलांसाठी वृध्दाश्रम निर्मीती व त्यांचेसाठी कार्य करणाऱ्या संस्थाना अर्थसहाय्य देणे, महिलांसाठी तिळगुळ व हळदीकुंकू कार्यक्रम, आरोग्य शिबीर व व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम, नोकरदार व व्यवयाय करणाऱ्या महिलांच्या लहान मुलांचे संगोपन व त्यांची देखभाल करण्याच्या दृष्टीने पाळणाघर निर्मिती व सेवाभावी नोंदणीकृत महिला गटांना पाळणाघर चालविणेसाठी अनुदान देणे, कुटूंबकल्याण कार्यक्रम, कुपोषित माता व बालकांसाठी सकस आहार, बालकांच्या विकासासाठी अन्य कार्यक्रम, महानगरपालिका रुग्णालयातील प्रसुती विभागातील रुग्णांना पोषण व अल्पोपहार भत्ता, जननी शिशु सुरक्षा योजनेच्या लाभासह प्रसुत महिलांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर रु. १६००/- इतका पोषण व आरोग्य भत्ता देणे, डायलेसिस उपचार स्वयंसेवी संस्थामार्फत घेणाऱ्या मुली व महिलांना अनुदान देणे, यासह महिला बालकल्याण समिती मार्फत आयोजित केल्याजाणाऱ्या इतर योजना व कार्यक्रमासाठी आणि महिला व बालकल्याण योजनंतर्गत भांडवली कामे यासाठी सन २०१६-१७ मध्ये रु. १० कोटी ८० लक्ष ८६ हजार व २०१७-१८ मध्ये रु. १२ कोटी ४६ लक्ष इतकी तरतूद आहे.

**२५ परिवहन व्यवस्था :-** वस्ती येथे बस सेवा या संकल्प पुर्तीसाठी महानगरपालिका बचनबध्द असुन त्या दृष्टीने परिवहन सेवा BOOM तत्वावर यशस्वीपणे सुरु झाली आहे. शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरीक, अपंग व्यक्ती, महिला व बालके यांचेसाठी विशेष सवलती, नितीकीट प्रवास सेवा इत्यादी संदर्भाने परिवहन सेवेत आवश्यक तरतुदी असुन आवश्यक तरतुदी असुन महानगरपालिकेने निर्णय घेतल्यास सवलतीच्या खर्चाची प्रतिपुर्ती इत्यादीकामी महानगरपालिका निधीतुन ब अदाजपत्रकाकडे सन २०१६-१७ मध्ये रु. ३२ कोटी १९ लक्ष ७० हजार व सन २०१७-१८ मध्ये रु. ६० कोटी इतकी रक्कम वर्ग करणेच तरतुद आहे.

**२६ दुर्बल घटक (पी बजेट) :-** यामध्ये गरीब गरजूंसाठी मोफत वैद्यकिय शिबीर, समुह गटविमा योजनेखाली मेडिक्लेम सुविधा प्राप्त करुन देणे त्याचप्रमाणे अपघाती विमा रकमे इतके थेट संरक्षणाचा लाभ देणे, दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत अधिक अधिक अनुदान उपलब्ध करुन घेऊन सदर वसाहत सर्व सुविधायुक्त स्वच्छ व सुंदर करणे, दारिद्रय रेषेखालील व्यक्तींसाठी घरकुल योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजनंतर्गत विकास कामे, विशेषत: नविन शहरी

विभागात वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदान देणे, कमी उत्पन्न गटातील शेतकऱ्यांसाठी , तसेच इतर दुर्बल घटकांसाठी घ्यावयाच्या योजनांसाठी ५% राखीव तरतूदीसह पी बजेट करीता सन २०१६-१७ मध्ये रु. १२ कोटी ८८ लक्ष ८२ हजार व २०१७-१८ मध्ये रु. ५५ कोटी ९५ लक्ष इतकी तरतूद आहे

**२७ वनीकरण खर्च** :- महानगरपालिका व वन खात्याच्या संयुक्त विद्यमाने ५०० हेक्टर जागेत वनीकरण प्रकल्प सुरु आहे. पर्यावरण संरक्षणाचे इतर कार्यक्रम, वृक्ष संरक्षण, वृक्ष गणना, नागरी वनीकरण, नागरी वनीकरण योजनेसाठी पाण्याचे टॅकरची व्यवस्था करणे, नारिंगी टेकडीचा विकास प्रभावीपणे करुन हॅंगींग गार्डन निर्मितीसह वन्य प्राण्यासाठी अभय अरण्य, सर्पोद्यान, पक्षी उद्यान, वनस्पती उद्यान तसेच रोपांसाठी पिंजरे खरेदीसह वृक्ष निधी अंतर्गत इतर भांडवली कामे करणे कामी सन २०१६-१७ मध्ये रु. ९ कोटी १३ लक्ष व सन २०१७-१८ मध्ये रु. १५ कोटी ५१ लक्ष इतकी तरतुद आहे.

आभार,

मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर सो, माजी. खासदार श्री. बळीरामजी जाधव सो, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर सो, मा. आमदार श्री. विलासजी तरे सो, मा. महापौर सौ. प्रविणाजी ठाकूर, मा. उपमहापौर श्री. उमेशजी नाईक वसई -विरार शहर माहनरगपालिकेचे मा. स्थायी समिती सभापती श्री. नितीनजी राऊत सो, यांनी वेळोवेळी केलेल्या सुचनांप्रमाणे महानगरपालिकेच्या तयार करण्यात आलेल्या ‘ Vision Document’ मधील बाबींचा अंर्तभाव सदर अर्थसंकल्पात त्या-त्या घटकामध्ये केलेला आहे. सर्व सन्मा. गटनेते व सन्मा. सदस्याकडून तसेच सर्व सन्मा. नागरीकांकडून देखील त्यांचे विचार व अपेक्षा आणि कल्पना जाणून घेण्याचा आम्ही वेळोवेळी प्रयत्न केला असुन त्याबाबीदेखील अर्थसंकल्पामध्ये विचारात घेतलेल्या आहेत.

सन २०१६-१७ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०१७-१८ चे मुळ सर्वसाधारण अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक "अ", महानगरपालिकेच्या "अ" अंदाजपत्रकातील अंशदानासह पी बजेटचे अंदाज, जेण्डर बजेटचे अंदाज, अंध व अपंगाच्या कल्याणकारी योजनांसाठीच्या बजेटचे अंदाज, "ब" अंदाजपत्रकाकडे परिवहन सेवेकरीता वर्ग करावयाच्या अंशदानाचे अंदाज, जल मल प्रवाह निधी अंदाजपत्रक "क", वृक्ष निधी अंदाजपत्रक, एकत्रित पाणीपुरवठा व मल प्रवाह विनियोग कर्ज निधी अंदाजपत्रक, सॅटेलाईट सिटी / अमृत

योजना इत्यादी विशेष निधीचे अंदाजपत्रक, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९५ (अ) नुसार, सन २०१५-१६ या कालावधीत अर्थसहाय्य देऊन पुरविलेल्या सेवांबाबतचा अहवाल व इतर आवश्यक सहपत्रे सोबत जोडली आहेत.

आपल्या क्षेत्रात नवी दिशा देण्याचा व तद्नुसार सुनियोजीत कामकाज करणेचा प्रयत्न करणेस सर्व मान्यवर पत्रकार, प्रसारमाध्यमे व वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील तमाम जनतेने केलेल्या सहकार्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे. तसेच मौलीक सहकार्य व मार्गदर्शन कायम लाभेल या सदीच्छेसह सन २०१६-१७चा सुधारीत व सन २०१७-१८ चा मुळ अर्थसंकल्प सविनय सादर.

धन्यवाद ! जय हिंद !!

सतिश लोखंडे

दिनांक :-

वसई विरार शहर महानगरपालिका, आयुक्त